। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २१५ वा । मंगळवार, दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## माओवादी कमांडर मडवी हिडमा एन्काऊंटरमध्ये ठार



**आंध्र प्रदेश/वृत्तसंस्था :** भारतीय सुरक्षा दलं अन् नागरिकांवर झालेल्या २६ नक्षलवादी हल्ल्याचं नेतृत्व करणाऱ्या मडवी हिडमाचा एन्काऊंटर करण्यात आला आहे. आंध्र प्रदेशातील अल्लुरी सितारामराजू जिल्ह्यातील मरेदुमिल्ली जंगलात नक्षलवादी आणि आंध्र प्रदेश पोलीस यांच्यात चकमक उडाली होती. या भागाला आंध्र प्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणा या तीन राज्यांच्या सीमा लागून आहेत. या चकमकीत हिडमा सोबत जवळपास सहा नक्षलवाद्यांचे मृतदेह आतापर्यंत हाती लागले आहेत. हे ऑपरेशन अजून सुरू आहे.

आंध्र प्रदेशचे डीजीपी हरीश कुमार गुप्ता यांनी या चकमकीबाबत माहिती दिली. त्यांनी सांगिलं की ही चकमक आज सकाळी ६ ते ७ च्या सुमारास सुरू झाली. पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या कारवाईत सहा माओवादी दहशतवादी ठार झाले आहेत. त्यात त्यांच्या लीडरचा देखील समावेश होता. नक्षलवादाविरूद्धचं मोठं ऑपरेशन सध्या सुरू आहे.

### कोण होता हिडमा?

हिडमाचा जन्म हा मध्य प्रदेशातील सुकमा मध्ये १९८१ मध्ये हिडमाचा जन्म झाला होता. हिडमा हा पिपल्स लिबरेशन गोरिल्ला आर्मीच्या बटालियनंच नेतृत्व करत होता. तो सीपीआय माओवादी ग्रुपच्या निर्णय प्रक्रियेतील केंद्रीय समितीचा सर्वात तरूण सदस्य होता. तो या संघटनेतील केंद्रीय समितीमधला बस्तर भागातील एकमेव आदिवासी सदस्य होता. हिडमावर ५० लाखाचं बक्षीस होतं. त्याची पत्नी राजाक्का ही देखील या चकमकीत ठार झाल्याचं समजतंय.

मडवी हिडमा हा अनेक मोठ्या हल्ल्याचा सूत्रधार होता. त्यानं २०१० मध्ये दंतेवाडातील हल्ल्यात देखील सहभाग घेतला होता. या हल्ल्यात ७६ सीआरपीएफ जवान ठार झाले होते. त्यानंतर त्यानं २०१३ मध्ये जिरम घाटीत देखील हल्ला केला होता. त्यात २७ लोकांचा जीव गेला होता. यामध्ये काँग्रेसचे अनेक बड्या नेत्यांचा देखील समावेश होता. हिडमानं २०२१ च्या सुकमा बिजापूर हल्ल्यात देखील मोठी भूमिका बजावली होती. या हल्ल्यात सुरक्षा दलाचे २२ जवान ठार झाले होते.

### सुरक्षा दलांचे मोठे यश

अनेक मोठ्या हल्ल्यात सहभागी असलेल्या हिडमाचा खात्मा करणं ही सुरक्षा दलांसाठी मोठी कामगिरी आहे. यामुळं मोओवाद्यांना मोठा दणका बसला आहे. सध्या देशभरात नक्षलवादाविरूद्धची मोहीम वेगवान करण्यात आली आहे. अनेक नक्षलवादी शस्त्र खाली ठेवून आत्मसमर्पण करत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या महिन्यात दिलेल्या माहितीनुसार २४ तासात जवळपास ३०० माओवाद्यांनी शस्त्र खाली ठेवून आत्मसमर्पण केलं होतं.

माओवाद्यांच्या या आत्मसमर्पण प्रक्रियेतील सर्वात मोठं आत्मसमर्पण हे मालोजुला वेणुगोपाल राव उर्फ भूपती यांच होतं. त्यानं १४ ऑक्टोबर रोजी शस्त्र खाली ठेवलं अन् मुख्य प्रवाहात दाखल झाला.

त्यानं माओवाद्यांच्या कमांडरना जे सत्तेसाठी सशस्त्र संघर्ष करत आहेत. त्यांना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की हा मार्ग त्यांना लोकांपासून दूर नेत आहे. हेच सशस्त्र संघर्षाच्या मार्गाचं अपयश आहे.

त्यानं सध्या कार्यरत असलेल्या माओवाद्यांना शस्त्र खाली ठेवून आत्मसर्पण करण्याचं आणि मुख्य प्रवाहात परतण्याचं आवाहन देखील केलं.

## दयानंद कला महाविद्यालयात पदवीधर मतदार नोंदणी अभियानाला उत्साहपूर्ण प्रतिसाद

लातूर : दयानंद कला महाविद्यालयात पदवीधर मतदार नोंदणी अभियान उत्साहात पार पडले. महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र व अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने दि.११ ते १७ नोव्हेंबर दरम्यान हे विशेष अभियान आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालय परिसरात नोंदणी केंद्र उभारून कर्मचाऱ्यांना तसेच माजी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी फॉर्म भरून देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. पदवी प्रमाणपत्र, ओळखपत्र आणि आधारकार्ड यांची माहिती सादर करून नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेत





सक्रिय सहभागाचे महत्त्व पटवून दिले. जागरूक मतदार घडविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.अभियानादरम्यान मोठ्या संख्येने पदवीधरांनी सहभाग नोंदवून आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी अर्ज सादर केले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ.अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित डॉ. संतोष पाटील, डॉ. बालाजी घुटे प्रा. गजानन घायाळ तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## ३१ वर्षांपासून फरार असलेल्या घरफोडी प्रकरणातील आरोपीस लातूर पोलीस विशेष पथकाची अटक

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर पोलीसांच्या विशेष पथकाने डारमंड फाईलमध्ये नोंद असलेल्या घरफोडीच्या गंभीर गुन्ह्यात ३१ वर्षांपासून पोलीस व न्यायालयास चकवा देत फरार असलेल्या एकाय अटक करून एक महत्त्वपूर्ण कामगिरी साध्य केली आहे.

पोलीस स्टेशन गांधीचौक, लातूर येथे गु.र. नं. २०/१९९४, कलम ४५७, ३८०, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल होता. तसेच आरसीसी नं. ३९४/१९९४ व डी.एफ. नं. ५८/२०१४ या डारमंड फाईल प्रकरणातही आरोपीचा समावेश होता. दि. १०/०२/१९९४ ते ११/०२/१९९४ च्या रात्री फिर्यादी दत्तू बाबू नवघन (रा. झिन्नत सोसायटी, लातूर) यांच्या



घरात तीघांनी संगनमताने घराचे कुलूप व दाराची कोंडी तोडून घरात प्रवेश करत ११,००० रोख रक्कम , २४ साड्या व इतर घरगुती साहित्य असा एकूण १६,४२५/- किंमतीचा मुद्देमाल चोरीस नेण्यात आला होता. या प्रकरणातील गुन्हा दाखल झाल्यापासून फरार राहून पोलीस व न्यायालयापासून लपून राहत होता.

विशेष पथकास प्राप्त झालेल्या गुप्त माहितीनुसार, दिपक निवृत्ती कांबळे, वय ५५ वर्षे, रा. विलासनगर, लातूर हा मागील काही दिवसांपासून विलासनगर परिसरात वास्तव्य करत असल्याचे समजले. यानंतर विशेष पथकाने मिळालेल्या माहितीस पडताळणी करून ही कारवाई केली

मिळालेली माहिती वरिष्ठ अधिकारी यांना कळवून दिनांक १७/११/२०२५ रोजी सकाळी त्याच्या घरावर पथकाने धाड टाकली व त्यास ताब्यात घेण्यात आले आहे. त्यास अटक करून मा. न्यायालय समक्ष हजर करण्यात आले असता मा. न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, श्री. अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक, श्री. मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर, श्री. समीरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनात सपोनि श्री. मनाळे, पोलीस अमलदार दत्तात्रय शिंदे, वालचंद नागरगोजे,योगेश गायकवाड श्रीकांत कुंभार यांनी केली आहे.

लातूर पोलीस विशेष पथकाने ३१ वर्षांपासून फरार झालेल्या आरोपीस अटक करून डारमंड फाईलमधील एक महत्त्वपूर्ण प्रलंबित गुन्हा उघडकीस आणत प्रशंसनीय कामगिरी केली आहे. भविष्यातही अशा प्रलंबित आणि फरार आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

## राज्य मंत्रिमंडळाने घेतले सहा मोठे निर्णय



**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आणि मंत्रिमंडळातील इतर प्रमुख मंत्र्यांच्या उपस्थितीत आज (मंगळवार, १८ नोव्हेंबर) मुंबईत राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सहा महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यानुसार, राज्यातील सिडकोसह वेगवेगळ्या प्राधिकरणांकडील जमिनींचा व भूखंडांचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी धोरण निश्चित करण्यात आलं आहे. तसेच संकल्पना आधारित आयकॉनिक शहर विकासासाठी धोरण जाहीर करण्यात आलं आहे.

मंत्रिमंडळ बैठकीत नगरविकास, गृहनिर्माण, मदत व पुनर्वसन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महिला व बाल विकास विभाग आणि विधी व न्याय विभागांतर्गत एकूण सहा निर्णय घेण्यात आले.

### नगर विकास विभाग

राज्यातील सिडकोसह, विविध प्राधिकरणांकडील जमिनी, भुखंडाचा सुयोग्य वापर निश्चित करण्यास प्राधान्य. संकल्पना आधारित आयकॉनिक शहर विकासासाठी धोरण जाहीर. सिडकोसह, अन्य प्राधिकरणांना संबंधित संकल्पनांवर आधारित एकात्मिक वसाहती निर्माण करण्याकरिता अधिकार मिळणार. निवासी एकात्मिक वसाहत किंवा आंतरराष्ट्रीय व्यावसायिक क्षेत्रांची उभारणी होणार. सिडकोसह, विविध प्राधिकरणांकडील लॅन्ड बँकेचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी धोरण निश्चित करण्यात आलं.

### गृहनिर्माण विभाग

बृहन्मुंबई उपनगरातील २० एकर किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळावरील म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचा पुनर्विकास करण्याबाबतचे धोरण निश्चित. यातून मुंबई शहर व उपनगर क्षेत्रामध्ये नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणात परवडणारी घरे उपलब्ध होणार.

### मदत व पुनर्वसन विभाग

भूसंपादन, पुनर्वसन, पुनर्स्थापनेशी संबंधित प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी नवीन पदांची निर्मिती केली जाईल. यामुळे भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ६४ अन्वये दाखल असलेल्या प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होणार.

### कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकरिता ३३९ पदांची निर्मिती केली जाणार. आजच्या बैठकीत शिक्षकांची २३२ आणि शिक्षकेतर १०७ पदांना मान्यता देण्यात आली आहे..

### महिला व बाल विकास विभाग

महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध कायद्यातील मानहानीकारक शब्द वगळण्यास मान्यता. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विधी व न्याय विभागाने केलेल्या शिफारशींनुसार महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५९ या अधिनियमातील कलम ९ व कलम २६ मधील महारोगाने पिडीत, कुष्टरोगी, कुष्ठालये असे शब्द वगळणार.

### विधि व न्याय विभाग

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यास मान्यता.

## मुख्यमंत्र्यांसोबतच्या कॅबिनेटला दांडी, शिवसेना मंत्र्यांची मोठी नाराजी

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून नगरपालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपुष्टात आली आहे. त्यामुळे, राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायत निवडणुकीत काही ठिकाणी महायुती तर काही ठिकाणी स्वबळावर निवडणुका लढत असल्याचं पाहायला मिळालं. मात्र, राज्यातील अनेक नगरपालिकांमध्ये भाजपने शिवसेना शिंदे गटातील उमेदवार आपल्या पक्षात घेत त्यांना उमेदवारी दिली. त्यावरुन भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेत राजकीय संग्राम सुरू झाल्याचं दिसून येत आहे. त्यामुळेच, आजच्या कॅबिनेट बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे वगळता एकही शिवसेनेचा मंत्री उपस्थित नव्हता. मात्र, यामागे नेमकं कारण काय अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**मुख्यमंत्री लाडकी बह ीण योजनेला ई - केवायसी ला ३१ डिसेंबर पर्यंत मदत वाढ...**

### चिमटा



दयाचा

**रस्त्यात खड्डे पडल्याने शरीरातील हाडे खिळखिळी होत आहेत ! हाडा-मणक्याचे आजार वाढत आहेत! !**

## विकास रत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखान्याकडून गाळपास प्रारंभ

### मांजरा पट्ट्यात शेतकऱ्यांना आनंद

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यात नव्हे देशात हार्वेस्टर द्वारे उसाची तोडणी करणारा पहिला सहकारी साखर कारखाना असलेल्या विकास रत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखान्याकडून चालु गाळपास दि. १६ नोव्हेंबर पासून प्रारंभ झाला असून त्यामुळें मांजरा पट्ट्यात ऊस उत्पादकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे दरम्यान कारखाना प्रशासनाकडून चालू गळीत हंगामात ९ लाख मेट्रीक टन ऊस गाळपाचे उद्दीष्ट कारखान्याने निश्चीत केले आहे त्यादृष्टीने सर्वत्र जय्यत तयारी सुरू केली आहे.

#### चालु गाळप यशस्वी होईल चेअरमन दिलीपराव देशमुख यांची माहिती

मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याकडून आजपर्यंतचे सर्व गळीत हंगाम यशस्वी झालेले आहेत. त्यामुळे चालु गाळप हंगाम पूर्ण क्षमतेने सुरू असून हा गाळप हंगाम सुधा निश्चित पणे यशस्वी होईल असा विश्वास राज्याचे माजी मंत्री तथा कारखान्याचे चेअरमन दिलीपराव देशमुख साहेब यांनी बोलताना व्यक्त केले मोठ्या कष्टाने शेतकरी आपला ऊस पिकवत असतात त्यामुळे त्यांचा ऊस वेळेत गाळप होण्यासाठी कारखान्याकडे आलेल्या नोंदी प्रमाणे ऊस तोडीचे नियोजन सातत्याने करून जास्तीचा ऊस दर देण्याचे काम केले कारखाना करीत आहे.

#### ऊसाला किमान दर ३१५०रूपये

कारखान्याचे चेअरमन आदरणिय दिलीपराव देशमुख साहेब, माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख साहेब यांच्या शुभ हस्ते व विविध संस्थांचे पदाधिकारी अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत मांजरा



कारखाना बॉयलर अग्निप्रदीपन व गव्हाणीत ऊसाची मोळी टाकून गळीत हंगामाचा शुभारंभ केला होता त्यावेळीं चालू गळीत हंगामात गाळपास आलेल्या ऊसाला किमान दर ३१५० राहील असे सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब व कारखाना संचालक माजी मंत्री आ.अमित विलासराव देशमुख साहेब यांनी जाहीर केला असल्याने शेतक-यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

## शेजार -शेजारी शेत असलेल्या दोन शेतकऱ्यांचा फवारणी करताना विषबाधेमुळे एकाचवेळी मृत्यू?

**चाकूर/प्रतिनिधी :** चाकुर तालुक्यातील अजनसोंडा बु. येथे शेतात तुर व कापूस पीक फवारणी करताना दोन शेतकऱ्यांचा विषबाधेमुळे मृत्यू झाल्याची संशयित दुर्दैवी घटना शुक्रवारी १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता घडल्याचे समोर आले असून त्यांच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे.





चाकूर तालुक्यातील अजनसोंडा येथील शेतकरी लिंबाजी निवृत्ती गवळे वय ५४ आणि अंगद ज्ञानोबा भालेराव वय ५८ हे दोघेही शेजारी शेतकरी होते. त्यांनी स्वतःच्या शेतात शुक्रवार १४ नोव्हेंबर रोजी तुर व कापूस पिकांवर तणनाशक फवारणी केली. परंतु फवारणीदरम्यान विषबाधा होवून काही वेळात त्यांची प्रकृती बिघडली, उलट्या झाल्यामुळे त्यातील अंगद भालेराव यांना हाळी तर लिंबाजी गवळे यांना चाकूरात खाजगी हॉस्पिटलमध्ये प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी लातूरला खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. परंतु उपचारादरम्यान दोघांचाही मृत्यू झाला आहे. या घटनेने अजनसोंडा आणि परिसरात शोककळा पसरली असून त्यांच्या मृत्यूने शेतकरी, गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

शेतकरी लिंबाजी गवळे वय ५४ आणि अंगद ज्ञानोबा भालेराव वय ५८ हे दोघेही अल्पभूधारक शेतकरी असून त्यांचा सर्व उदरनिर्वाह शेतीवरच अवलंबून होता. शेतीबरोबरच ते रोजंदारीवर काम करीत होते. अचानक झालेल्या या घटनेने त्यांच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

दोन्ही शेतकऱ्यांवर शनिवारी १५ नोव्हेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या शवविच्छेदनाचा अहवाल अद्याप आला नसून अहवाल आल्यावर त्यांच्या मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे.

लिंबाजी गवळे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी आणि दोन मुले तर अंगद भालेराव यांच्या पश्चात आई, पत्नी, तीन मुलं, दोन मुली असा परिवार आहे. शासनाने त्यांच्या कुटुंबाना आर्थिक मदत करावी अशी मागणी होत आहे.। 'वारणी क्रताना वषाधे'ळे एक्रचवेळी 'आभघू

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## दहशदवादाचा खातमा जगाने करावा

दहशदवादातून हिंसा घडविली जात आहे. हिंसा घडविणे हा अतिरेक्यांचा खेळ सुरू आहे. याला केवळ भारतच बळी पडतो आहे असे नाही तर जगाने याची झळ पाहीली आहे. अधिक प्रमाणात भारताला ही समस्या भेडसावत आहे. याचा विचार केला पाहिजे. गंभीरतेने विचार केला जर भारताने आपल्याच पायावर आपण दगड मारून घेतला आहे. ज्यावेळेस भारत देश स्वातंत्र झाला त्याच वेळेस भारतीय शिक्षण पद्धतीचा आवलंब करावयास पाहिजे होता. त्याच प्रमाणे लॉर्ड मेकाले यांची शिक्षण पद्धती घातक असताना त्याचाच मार्ग आवलंबला गेला. त्याच प्रमाणे दहशदवाद विषयी जसे अमेरिकेने धोरण आखले तसे भारताने आखले नाही. अमेरिकेमध्ये वर्ल्ड ट्रेड सेंटरवर आणि पेंटागॉनवर हल्ला झाला. नंतर प्रेसिडेंट बराक ओबामा यांना ओसामा बिन लादेन यास पाकिस्तानमधील अबोटाबाद येथे लष्करी कारवाई करून पकडले आणि त्याची समुद्रात विल्हेवाट लावली. खुद्द अमेरिकेने दहशतवाद अनुभवलेला असताना डोनाल्ड ट्रम्प पाकचे लष्करप्रमुख मुनीर याचे लांगुलचालन का करत आहेत, असा प्रश्न पडतो. या बाबत भारत चिंतन करीत नाही. खरी झळ ही पाकिस्तानाकडून बसते. भारताला शत्रु मानणारा प्रत्येक व्यक्ती हा पाकिस्तानी आहे हे विसरून चालणार नाही. पाकिस्ताने लागेबांधे जे गुपीत भारतात आहेत त्यांचा शोध घेतला जात नाही. भारत दहशदवादा विरोधात लढतो आहे. यात शंका नाही. मुळ दहशदवादाचा उगम कोठून आहे. यामागील कोण आहे त्याचा खातमा करीत नाही. वरवर कारवाई कामाची नाही उलट चिघळत आहे. त्यामुळे तर दहशदवाद फोफावत आहे. मुळात दहशदवाद हा वाढत आहे. पहलगामनंतर काय घडले आहे. दिल्लीतील घटनेवरून काय लक्षात आले यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. भारत अमेरिकेसारखी कारवाई करू शकणार नाही. अधिक तर भारताचा गिळंकृत अनाधिकृत केलेला प्रांतावर कारवाई करू शकतो. पाकव्याप्त काश्मीरावर कारवाई करू शकतो. यापेक्षा यापुर्वी भारतीय सैन्याने दाखविलेली कारवाई करेल असे वाटत नाही. अनेकांचा दबाब असणे स्वाभाविक आहे. वास्तविक माजी परराष्ट्रमंत्री दिवंगत सुषमा स्वराज यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या व्यासपीठावर केलेल्या भाषणात दहशतवादाचे संपूर्ण वस्त्रहरण केले होते. त्या म्हणाल्या होत्या की, आम्ही आयआयटी, आयआयएमसारख्या संस्था निर्माण केल्या व पाकिस्तानने दहशतवादाचे कारखाने चालविले. विकासाची फळे लोकांपर्यंत पोहोचविण्याऐवजी लोकांना गुमराह करून त्यांना दहशतवादाच्या चक्रात अडकविणारे कुठलेही सरकार जनतेचे भले करू शकत नाही. ही गोष्ट जेव्हा पाकमधील सामान्य जनतेला कळेल, तेव्हा तेथील दहशतवादाचे समर्थन कमी होऊ शकेल; परंतु पाकिस्तानात दहशतवादी संघटनांच्या कार्यालयात प्रत्यक्ष लष्करप्रमुख जातात आणि त्यांच्या पाठीशी उभे राहतात, हा राज्य पुरस्कृत दहशतवादाचा एक उत्तम नमुना आहे. आजही पकिस्तानी दरिद्री जीवन जगत आहे याचा फायदा दहशदवादी संघटना उचलत आहेत. मुलांच्या हाती शस्त्रे दिली जातात व धार्मिकतेच्या आडून भारतावर चालविण्यासाठी ब्रेनवॉश केले जाते. जगातील अनेक त्यांच्या जातीची मंडळींना ही बाब लक्षात येत असली तरी सुधाणाव्हावी यासाठी कोणीही प्रयत्न करीत नाहीत. दहशदवाद हा वाढत आहे. याचे स्वरुप दबलते आहे. पुर्वी आडणी, अशिक्षित लोक दहशदवाद माजवित होते आता शिकलेले डॉक्टर, इंजिनियर सारखी मंडळींचा समावेश असेल तर यापेक्षा दुसरे दुर्दैव भारताचे नाही. भारतात राहुन भारतीय विद्यापिठामध्ये ज्ञान संपादन करून हिंसा घडविण्याचा मोठा डाव आखला जातो. तोही यशस्वी होतो यापेक्षा भारतीयांचे दुसरे दुर्दैव नाही. ही बाब प्रत्येक भारतीयांनी लक्षात आली पाहिजे. दहशदवादास काही दिवसात भारत वटणीवर आणू शकतो. असे वाटत असले तरी देशात काहींची वाढती संख्या पाहात ते शक्य नाही. देशातील परिस्थितीचा पाया बिघडता आहे. मुळ शिक्षणात अमुलाग्र बदलाची गरज आहे. वास्तविक पाकिस्तान कोणी निर्माण केला. त्यावेळीच्या चुकीचा धोरणाचा त्रास आजच्या पिढीला सहन करावा लागत आहे. आज चुकीची माहिती बरोबर भारताविरोधात आपल्याच देशात विष पेरले जात आहे याच बाबीकडे दुर्लक्ष होत आहे. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर एक घाव दोन तुकडे केले असते तर आज दिल्लीसारख्या घटना पाहावयास मिळाल्या नसत्या. आज इतरांना दोष देण्यापेक्षा आपणच आपल्या देशस्वातंत्र्याच्यावेळी केलेल्या चुकामुळे प्रायश्चित भोगत आहोत. त्यामुळे आजही स्थिती मर्यादित आहे आगामी कांही काळात याचे मोठे स्वरुप हे हाताच्या बाहेर जाईल. जसे व्यापारी म्हणून ब्रिटीश आले व राज्यकर्ते बनले. तसे दहदवादीच एक ना एक दिवस देश ताब्यात घेणार नाही कशा वरून? त्यांची तयारी मोठी आहे. लहान मुलापासून ते वृद्धा पर्यंत भारतीयावर गोळ्या घालण्याचे प्रशिक्षण दिले जाते. ही एक भारताविरोधी तयारीच म्हणावी लागेल. दुर्दैव असे की चीन, अमेरिका, इंग्लंड यांसारखी सुरक्षा परिषदेत 'व्हेटो' अधिकार असणारी राष्ट्रे जोपर्यंत दहशतवादाबाबतचा दुटप्पीपणा सोडत नाहीत, तोवर दहशतवादाविरुद्धची लढाई संपणार नाही. ही लढाई भारताने एकट्याने लढायाची आहे. पर्वजांच्या चुकीमुळे ही समस्या भेडसावत आहे. आता दहशदवादाचे बदलते स्वरूप भयाण आहे. सुशिक्षितांनी स्विकारलेला दहशदवाद हा अणुबॉम्बपेक्षा मोठा असण्याची शक्यता आहे. त्यामुळे वेळीच भारतीयांनी सावध होण आवश्यक आहे. दिडशे वर्ष गुलामगिरीत काढले तसीच पुन्हा गुलामगिरी पदरी पडू नये. ज्यावेळी सुशिक्षित उच्च शिक्षित मंडळी दहशदवादी कारवायात आडकले असतात त्यावेळी समस्या हालक्यात घेऊ नये. उच्चशिक्षितांचा दहशदवाद हा परवडणारा नाही. आज दिल्लीस्फोटातील पुरावे सापडत आहेत. ते भयाण आहेत. सर्वाधिक हिंसक बाबी यात आहेत. त्या रोखणे यदाकदाचित आवघड होण्याची शक्यता आहे. प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य म्हणजे दहशदवाद राखणे हा आहे. दहशदवादाचे बदलते स्वरूप ही मोठी समस्या आहेच त्यापेक्षा मानवसंहारक शक्तीचा प्रयोग आगामी काळात अधिक होण्याची शक्यता आहे.

# लातूर पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकविण्याचा बोरीच्या मेळाव्यात संकल्प प्रत्येक ठिकाणी तोलामोलाचे सक्षम उमेदवार देणार :आ. रमेशआप्पा कराड



**लातूर/प्रतिनिधी** : केंद्रात आणि राज्यात भाजपाच्या नेतृत्वातील शासन सर्वांगीण विकासासाठी, सर्वसामान्यांच्या हितासाठी काम करत असून ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी भाजपा शिवाय पर्याय नाही. रेणापूर नगरपंचायतीसह पंचायत समितीवर पुन्हा भाजपाचा झेंडा फडकणार हे सूर्यप्रकाशा इतके सत्य असून यावेळी कुठल्याही परिस्थितीत लातूर पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकला पाहिजे यासाठी सर्वांनी संकल्प करावा. लातूर ग्रामीणमधील काडगाव जिप मतदार संघातून नाथसिंह देशमुख यांची उमेदवारी जाहीर करत सर्वच जागेवर तोलामोलाचे सक्षम उमेदवार देऊन तेरापैकी आकरा जागेवर भाजपा विजयी होणार असल्याचे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

भारतीय जनता पार्टी लातूर ग्रामीण मंडळाच्या वतीने येत्या काळात होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने भातांगळी जिल्हा परिषद मतदार संघाचा लातूर तालुक्यातील मौजे बोरी येथे भाजपाच्या विजयाचा संकल्प मेळावा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी झाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी वाजिद पटेल हे होते तर या मेळाव्यास भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, भाजपाचे ज्येष्ठ नेते नाथसिंह देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले यांच्यासह मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, महादेव साळुंके, विजयकुमार मलवाडे, सतीश आंबेकर, साहेबराव मुळे, विजय काळे, पांडुरंग बालवाड, बापूराव चामले, सूर्यकांत शेळके, महेंद्र गोडभरले, सुरज शिंदे, शरद दरेकर, आदिनाथ मुळे यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्यास भातांगळी जिल्हा परिषद मतदार संघातील गावागावातील भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी काँग्रेसच्या अनेकांनी भाजपा जाहीर प्रवेश केला. आ. कराड यांचे बोरी गावात आगमन होताच ढोल ताशाच्या गजरात



फटाक्याच्या आतिषबाजीने जेसीबीतून फुले उधळून जोरदार स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, स्वातंत्र्यानंतर सर्वाधिक काळ देशात आणि राज्यात काँग्रेसनेच सत्ता हस्तगत करून कारभार केला. गेल्या अकरा वर्षात परिवर्तन झाले. केंद्रात नरेंद्रजी मोदी आणि राज्यात देवेंद्रजी यांच्या नेतृत्वातील शासनाने अनेक कल्याणकारी योजना राबवून गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना देण्याचे काम झाले. मात्र काँग्रेसवाल्यांनी आजपर्यंत गरिबांना गरीबच ठेवण्याचे पाप केले त्यामुळेच संपूर्ण देशभर काँग्रेसची वाताहत होत असल्याचे सांगून लातूर ग्रामीण मध्ये पंधरा वर्ष काँग्रेस आमदाराने काय विकास केला कोणत्या गावाला कुठली योजना दिली असा प्रश्न उपस्थित करून गेल्या चार वर्षात मतदार संघातील प्रत्येक गावागावात वाडी वस्तीत विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला असल्याचे बोलून दाखविले.

साखर कारखाने शेतकऱ्याच्या मालकीचे असताना स्वतःला सहकार महर्षी समजणारे कारखाने स्वतःची जहागिरी समजून आजपर्यंत आडवा आणि जिरवाचे राजकारण केले या पुढील काळात असले राजकारण चालू देणार नाही असा इशारा देऊन आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, विधानसभेत धनशक्ती विरुद्ध जनशक्तीचा विजय झाला आपण मला मोठा आशीर्वाद दिला विधानसभेत पाठवले विकास निधी काय असतो हे विकास कामातून जनतेला दाखवून दिले. जनता दरबारच्या माध्यमातून ७० टक्के प्रश्न निकाली काढण्याचा प्रयत्न केला असून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी गोरगरिबांच्या हितासाठी येणाऱ्या काळात होणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूकीत भाजपला साथ द्या असे आवाहन केले.

यावेळी बोलताना नाथसिंह देशमुख यांनी रमेशआप्पा कराड हे सामान्य माणसाचे आमदार आहेत त्यांना प्रत्येक गावातील अडचणीची जाण आहे या मतदारसंघात जसा आमदार हवा होता तसा निवडून दिला त्याबद्दल जनतेचे आभार व्यक्त करून येणाऱ्या काळात आपणास साथ द्या भाजपाला विजयी करा असे आवाहन केले. तर विक्रमकाका शिंदे यांनी जनता दरबार घेऊन जनतेच्या प्रश्नाची रमेशआप्पांनी सोडवणूक केली जनता दरबार या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले असल्याचे सांगून मतदार संघातील गावागावात विकास निधी दिला असल्याचे बोलून दाखवले.

प्रारंभी भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील यांनी प्रास्ताविकातून भातांगळी जिल्हा परिषद मतदार संघ भाजपाला मताधिक्य देणार असल्याचे बोलून दाखवले तर पांडुरंग बालवाड, आदिनाथ मुळे, व्यंकटराव जटाळ, संजय ठाकूर यांनी रमेशआप्पाच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामाची माहिती देऊन जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूकीत भाजपाचाच प्रचंड मताधिक्याने विजय होणार असल्याचे बोलून दाखवले.

बोरी येथील मेळाव्यास भाजपाचे सुरेखा पुरी, पद्माकर चिंचोलकर, संजय ठाकूर, अशोक बिराजदार, हनुमंत गव्हाणे, मारुती शिंदे, चंद्रकांत पासमे, राम बंडापल्ले, सतिश बिराजदार, भैरवनाथ पिसाळ, लक्ष्मण नागिमे, दीपक वांगस्कर, रुपेश थोरमोठे, लिंबराज बोळंगे, पुंडलिक बेंबडे, रुपेश काळे, लक्ष्मण मुळे, धनंजय बंडापल्ले, विजय ठाकूर, संजय सावंत, आत्माराम जाधव, सुरेश पाटील, मुकुंद केसरे, बालाजी पांचाळ, आत्माराम शिंदे, यादवराव पाटील, महेश सुरवसे, धीरज सपाटे, गणेश बेंबडे, विकास पेदाटे, राजेंद्र खुर्दळे यांच्यासह बोरी, सलगरा, दगडवाडी, मुशिराबाद, उमरगा, रमजानपुर, भातांगळी, चिकलठाणा, बामणी, भाडगाव, भातखेडा, भडी, ममदापूर यासह भातांगळी जिल्हा परिषद मतदार संघातील गावा गावातील वाडी वस्तीतील भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी लोकप्रतिनिधी मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाभळगाव येथे जागृति शुगरच्यावतीने ९ मेगावॅट क्षमतेचा सोलार ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ

### माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, सौ सुवर्णाताई देशमुख, धीरज देशमुख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती





**लातूर/प्रतिनिधी** :राज्याच्या साखर उद्योगात अव्वल स्थानावर कार्य करत असलेल्या देवणी तालुका तळेगाव येथील जागृती शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीजच्या वतीने लातूर तालुक्यातील बाभळगाव येथे ९ मेगावॅट क्षमतेचा सोलार ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला असून या प्रकल्पाचा शुभारंभ राज्यांचे माजी मंत्री जागृति शुगर चे संस्थापक अध्यक्ष सहकार महर्षी आदरणीय श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब व आदरणीय सौ सुवर्णाताई दिलीपराव देशमुख जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख यांच्या हस्ते अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत विधीवत पुजन करून प्रकल्पाचा शनीवारी शुभारंभ करण्यात तत्पूर्वी भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या धनेगाव तालुका लातूर येथील श्री रोकडेश्वर देवस्थान येथे मनोभावे दर्शन घेवून आरती केली व आशिर्वाद घेतले

सोलार ऊर्जामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होईल या प्रकल्पाच्या माध्यमातून पर्यावरणीय ऊर्जा निर्मितीला चालना मिळणार असून शाश्वत विकासासाठी हा प्रकल्प मोलाचा ठरणार आहे. महत्वाचे म्हणजे या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना दिवसा देखील विज उपलब्ध होवू शकणार आहे. साखर उद्योगात मांजरा परिवारातील साखर कारखाने उत्तम कार्य करत असून यातून इतरांना प्रेरणा मिळत आहे

यावेळी जागृति शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे आदित्य ग्रीन एनर्जी प्रा.ली. संचालक आदिनाथ सांगवे, संचालक विपुल जोईच्यर, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे, जागृति शुगर चे संचालक दिलीप माने, रेणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा संचालक यशवंतराव पाटील ट्वेंटी वन शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख , जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव देशमुख उपाध्यक्ष अँड प्रवीण पाटील, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले उपाध्यक्ष सचिन पाटील,गणपतराव बाजुळगे, जागृती शुगरचे तज्ञ संचालक बालाजी बिराजदार, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विलास साखर कारखान्याचे संचालक रवींद्र काळे, रेणा साखर कारखान्याचे संचालक संभाजी रेड्डी, प्रताप पाटील संभाजी सुळ,सुभाष घोडके बाळासाहेब कदम, बादल शेख, अविनाश देशमुख जागृति शुगर चे जनरल मॅनेजर गणेश येवले यांच्यासह मांजरा परिवारातील संस्थांचे पदाधिकारी कार्यकर्ते शेतकरी पंचक्रोशीतील शेतकरी बांधव मान्यवर उपस्थित होते

## रेणापूर नगरपंचायत निवडणूकीसाठी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांचे अर्ज दाखल

**लातूर/प्रतिनिधी** : रेणापूर नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठीच्या उमेदवारांनी रेणापूर तहसील कार्यालयात एकत्रित जावून उमेदवारी अर्ज दाखल केला.

प्रारंभी सर्व उमेदवारांनी लाखो भाविक भक्तांचे श्रध्दास्थान असलेल्या रेणुका मातेचे व त्यानंतर महेबुब सुभानी दर्गा येथे दर्शन घेवुन रेणापूर नगरपंचायतीसाठी काँग्रेस पक्षाने माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब, माजी मंत्री आ.अमित विलासराव देशमुख साहेब,माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक पुर्ण ताकदीने लढवण्याचा निर्णय घेतला असून नगरपंचायतीच्या माध्यमातून स्वच्छ व पारदर्शक कारभार करून नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जातील असे सांगण्यात आले असून यासाठी जनतेच्या मनातील चांगले उमेदवार दिले आहेत. विकासाभिमुख व भ्रष्टाचार मुक्त कारभारासाठी काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांना मतदारांनी निवडून द्यावे असे आवाहन यावेळी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

यावेळी माजी जि . प . अध्यक्ष संतोष देशमुख , मारुती महाराज साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन तथा निरीक्षक सचिन पाटील , कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रमोद कापसे , कृउबा समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे , उपसभापती ॲड . शेषेराव हाके , कृउबाचे माजी सभापती रमेश सुर्यवंशी , पं स माजी उपसभापती श्रीनिवास आकनगिरे , माजी सभापती बाळकृष्ण माने ,शहराध्यक्ष पदमसिंह पाटील , माजी सरपंच अशोकराव राजे ,कृउबाचे संचालक हनंतराव पवार , अशोक राठोड ,ॲड .शिरीष यादव , मुरलीधर पडोळे , प्रकाश सुर्यवंशी , जनार्धन माने , महेश खाडप , गजेंद्र चव्हाण ,महिला कॉंग्रेसच्या तालुकाध्यक्षा पुजा इगे,शहराध्यक्षा निर्मला गायकवाड ,रेणाचे संचालक धनराज देशमुख, बालाजी हाके , बाळासाहेब करमुडे, विजयकुमार एकुरके, मुकेश राजे,विजय काळे, मनोहर व्यवहारे यांच्यासह एकूण १७ प्रभागातील निरीक्षक व नगरराध्यक्ष पदाचे उमेदवार माने अर्चना प्रदीप (राजू), नगरसेवक पदाचे उमेदवार प्रभाग क्र.१ सर्वसाधारण – काळे प्रदीप सुधाकर, प्रभाग क्र.२ सर्व साधारण महिला – राठोड कांताबाई हिरामण, प्रभाग क्र. ३ सर्व साधारण महिला – अकनगिरे पुजा सावंत, प्रभाग क्र. ४ अनुसूचित जाती – चक्रे अजयकुमार भिवा, प्रभाग क्र. ५ ना.मा.प्रवर्ग – भोकरे गोविंद प्रभू, प्रभाग क्र. ६ ना.मा. प्रवर्ग महिला – कातळे शीतल अतुल (अश्विनी), प्रभाग क्र. ७ सर्वसाधारण – मोटेगावकर सचिन अनुरथ, प्रभाग क्र. ८ सर्वसाधारण महिला – शिंदे राजश्री संतोष, प्रभाग क्र. ९ सर्वसाधारण महिला – पठाण यास्मीन रहिमखॉ, प्रभाग क्र. १० – सर्वसाधारण महिला – शेख रजियाबी पाशामियॉ, प्रभाग क्र. ११ – ना.मा.प्रवर्ग महिला – इगे इंदुबाई पुंडलिक, प्रभाग क्र. १२ ना.मा.प्रवर्ग – पनुरे मिनाक्षी भूषण, प्रभाग क्र. १३ सर्वसाधारण -- चव्हाण गजेंद्र मनोहर, प्रभाग क्र. १४ ना.मा. प्रवर्ग महिला – राठोड पुजा विलास, प्रभाग क्र. १५ अनुसूचित जाती महिला – सौदागर (कलाल) सुजाता बाबू , प्रभाग क्र. १६ सर्वसाधारण – कोल्हे संतोष तुकाराम, प्रभाग क्र. १७ सर्वसाधारण – थावरे गणेश श्रीमंत व रेणापूर तालुक्यातील आजी माजी सरपंच,युवक काँग्रेस, विलासराव देशमुख युवा मंच यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोलापूर रेल्वे विभागातील डॉ. कोटनीस मेमोरियल रेल्वे हॉस्पिटलमध्ये बालदिन उत्साहात साजरा



**सोलापूर/प्रतिनिधी** : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने बालकांच्या कल्याणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी वचनबद्धतेची पुष्टी करत डॉ. कोटनीस मेमोरियल रेल्वे हॉस्पिटलमध्ये बालदिन मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा केला. मुलांच्या सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विविध वयोगटातील मुलांचा सक्रिय सहभाग दिसून आला, ज्यांनी उत्साहाने अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतला.

८–१२ वर्षे वयोगटातील मुलांसाठी आयोजित क्विझ स्पर्धेत त्यांचे ज्ञान आणि टीमवर्कची चाचणी घेण्यात आली, तर पिक अँड स्पीक स्पर्धेत सहभागींना त्यांचे संवाद कौशल्य दाखवता आले. ८ वर्षांखालील मुलांसाठी, एका आनंददायी फॅन्सी ड्रेस स्पर्धेने उत्सवात रंगत आणि आकर्षण निर्माण केले. मुख्य वैद्यकीय अधीक्षक (सीएमएस) डॉ. मंजुनाथ आणि अतिरिक्त मुख्य वैद्यकीय अधीक्षक (एसीएमएस) डॉ. कृष्णा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाचे प्रभारी डॉ. विनोद यांच्या समर्पित प्रयत्नांसह, मुख्य परिचारिका अधीक्षक श्री राहुल गंबारे आणि मुख्य आरोग्य निरीक्षक श्री सागर नळ यांच्या प्रमुख सहकार्याने कार्यक्षमतेने समन्वय साधण्यात आला.

स्पर्धांचे मूल्यांकन डॉ. देवीलाल आणि डॉ. मेघना यांनी केले, त्यांनी मुलांच्या उत्साह आणि प्रतिभेचे कौतुक केले. प्रत्येक श्रेणीतील विजेत्यांना डॉ. मंजुनाथ (सीएमएस) आणि डॉ. रतन (डीएमओ) यांनी सन्मानित केले, त्यांनी सहभागींचे अभिनंदन केले. यावेळी रेल्वे कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या सक्रिय आणि उत्साही सहभागाने उत्सवाची चैतन्यशीलता वाढवली.

डॉ. कोटनीस मेमोरियल रेल्वे हॉस्पिटलमधील बालदिन कार्यक्रम आनंदाने संपन्न झाला. रेल्वे कुटुंबांसाठी सकारात्मक आणि पोषक वातावरण निर्माण करताना मुलांच्या सर्वांगीण विकासाला पाठिंबा देण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी सोलापूर विभागाच्या सततच्या प्रयत्नांवर या कार्यक्रमाने यशस्वीरित्या प्रकाश टाकला.

## लाहोटी विद्यालयात बालशक्तीचा जागर

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर येथील राजानारायणलाल लाहोटी विद्यालयात बालदिन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला या दिवशी पुष्प पाकळ्यांची उधळण करून विद्यार्थांचे विद्यालयात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य कर्नल श्रीनिवाससुलु, माध्यमिक समन्वयक मनोहर कबाडे ,प्राथमिक विभाग प्रमुख अरुल सेल्वी, विद्यालयातील क्रीडा, सांस्कृतिक विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या हस्ते स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बाल दिनानिमित्त अनाध्यायी दिवसाचे आयोजन करून विद्यार्थ्यासाठी मराठी बालगीत, कथाकथन, चित्रकला, बालचित्रपट अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

# विलासराव देशमुख फाउंडेशन, लातूर आणि अलिफ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाड्यातील सर्वात मोठा स्टडी अ‍ॅब्रॉड फेअर लातूरमध्ये; परदेशी शिक्षणाचे दरवाजे खुले!

**लातूर/प्रतिनिधी** : विलासराव देशमुख फाउंडेशन, लातूर आणि अलिफ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाड्यातील पहिला आणि सर्वात मोठा स्टडी अ‍ॅब्रॉड फेअर दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी व्ही.डी.एफ. कॅम्पस (नवीन एमआयडीसी, एअरपोर्ट रोड, लातूर) येथे आयोजित करण्यात येत आहे.

लातूरच्या विद्यार्थ्यांसाठी जागतिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करणारा हा एक ऐतिहासिक क्षण आहे.

जगभरातील नामांकित विद्यापीठे एकाच छताखाली

या स्टडी अ‍ॅब्रॉड फेअरमध्ये अमेरिका, इंग्लंड, स्पेन, स्वित्झर्लंड, जर्मनी, न्यूझीलंड, सिंगापूर, दुबई, नेदरलँड, मलेशिया अशा अनेक देशांमधील १५ हून अधिक नामांकित विद्यापीठे सहभागी होणार आहेत. लातूरमध्ये बसून जगभरातील विद्यापीठांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची सुवर्णसंधी विद्यार्थ्यांना या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. मेळाव्यात सहभागी होणारी प्रमुख विद्यापीठे:

यू.एम.ए.एस.एस. बोस्टन (अमेरिका) यू.सी.ए.एम. (स्पेन) एशिया स्पेसिफिक युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी अ‍ॅण्ड इनोव्हेशन-ए.पी.यु. (मलेशिया) डी मॉन्टफोर्ट युनिव्हर्सिटी (इंग्लंड) टी.आय.ओ. बिझनेस स्कूल (नेदरलँड) एच.टी.एम.आय. (स्वित्झर्लंड) जर्मन इंटरनॅशनल कॉलेज (जर्मनी) युनिव्हर्सिटी ऑफ कॅंटरबरी (न्यूझीलंड) एम.डी.एक्स. दुबई (दुबई)

तज्ज्ञांकडून सखोल मार्गदर्शन

या मेळाव्यात संबंधित विद्यापीठांच्या तज्ज्ञांकडून विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी महत्त्वाचे ठरणारे सखोल मार्गदर्शन मिळणार आहे:

अभ्यासक्रम आणि संधी: विविध देशांतील विद्यापीठांतर्गत चालणारे अभ्यासक्रम, त्यांचे महत्त्व, पात्रता, प्रवेश प्रक्रिया आणि अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर नोकरीच्या संधी याबद्दल माहिती मिळेल.

शिष्यवृत्ती योजना: किमान खर्चात आंतरराष्ट्रीय शिक्षण कसे घ्यावे,

देशनिहाय विविध शिष्यवृत्ती आणि असिस्टंटशिप्स याची सविस्तर माहिती दिली जाईल. / मार्गदर्शन: परीक्षा कशी द्यावी, किती गुण लागतात आणि कोणत्या कोर्स/देशासाठी कोणती परीक्षा आवश्यक आहे, यासाठी खास मार्गदर्शन

सत्र आयोजित करण्यात आले आहे.

व्यवहारिक माहिती: निवास, भोजन, हॉस्टेल, पार्ट-टाइम जॉब्स आणि स्थानिक

सुविधा (राहण्याचा खर्च, सुरक्षितता) याबद्दल पारदर्शक आणि अचूक माहिती दिली जाणार आहे.

हा फेअर म्हणजे संपूर्ण जग एका छताखाली आणणारा सुवर्णमेळावा आहे. तेव्हा लातूर जिल्ह्यातील १२ वी, ग्रॅज्युएशन किंवा पोस्ट ग्रॅज्युएशन कोर्समध्ये शिक्षण घेत असलेल्या अंतिम वर्षातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्टडी अ‍ॅब्रॉड फेअरला १९ नोव्हेंबर रोजी भेट देऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विलासराव देशमुख फाउंडेशन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे प्राचार्य डॉ. बालाजी वाकुरे, प्रा. राजकुमार साखरे आणि प्रा. महेश शिंदे यांनी केले आहे.

# सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते नाफेड खरेदी केंद्रचे उद्घाटन!



**शिरूर ताजबंद/प्रतिनिधी** : येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी शिरूर ताजबंद अंतर्गत नाफेड खरेदी केंद्र उद्घाटन राज्याचे सहकार मंत्री ना बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते सोमवारी दि. १७ नोव्हेंबर रोजी संपन्न झाले.

या वेळी बोलताना ना. पाटील या म्हणाले की, या भागातील शेतकरी यांची गरज ओळखुन नाफेड खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहे. या केंद्राचा सर्व शेतकरी यांनी लाभ घ्यावा असे आवाहन सहकार मंत्री ना. पाटील यांनी केले.

या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी सरपंच साहेबराव जाधव, दिलीपराव पाटील, पंडितराव धुमाळ, चेअरमन तुळशीराम भोसले, व्हाईस चेअरमन सुभाषराव गुंडरे, उमरगा चेअरमन राजकुमार सोमवंशी, उपसरपंच सुरज पाटील, नामदेव विराळे, बालाजी पडोळे, बालाजी गुंडरे, विजयकुमार यलमंटे, माधव सरवदे, सेक्रेटरी गोविंदराव तांबळगे, बाळासाहेब बेडदे, नारायण सूर्यवंशी, लक्ष्मणराव सारोळे, इब्राहिम पठाण, सर्व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडास्पर्धेत पुणे-बारामती परिमंडल संघाला अजिंक्यपद

## व्हॉलीबॉल, टेबल टेनिस, गोळा फेक, भाला फेक, बुध्दीबळ, कुस्ती व कॅरम स्पर्धेत लातूर-छत्रपती-नांदेड परिमंडलास सुवर्णपदक





**लातूर/प्रतिनिधी** : महावितरणच्या २०२५-२६ च्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत पुणे-बारामती परिमंडल संघाने वर्चस्व गाजवत सर्वसाधारण अजिंक्यपद पटकावले. गतवर्षी उपविजेता असलेल्या पुणे-बारामती संघाने हे तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावले आहे. तर नागपूर-चंद्रपूर-गोंदिया परिमंडल संघाने स्पर्धेतील उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड परिमंडलाच्या संघाने व्हॉलीबॉल, टेबल टेनिस, गोळा फेक, भाला फेक, बुध्दीबळ, कुस्ती व कॅरम स्पर्धेत ७ सुवर्णपदके पटकावत १६ बक्षीसे प्राप्त केली. या यशाबद्दल लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) श्री चेतन वाघ, कार्यकारी अभियंता श्री राजाभाऊ वडणे,उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री महेंद्र चुनारकर यांनी कौतूक करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडासंकुलात दि. १२ नोव्हेंबरपासून सुरू असलेल्या चार दिवसीय राज्यस्तरीय स्पर्धेचा शनिवारी (दि. १५) सायंकाळी समारोप झाला. यावेळी महावितरणचे संचालक श्री. सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प) व श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांच्याहस्ते अजिंक्यपदाचा करंडक पुणे-बारामती परिमंडल संघाकडून मुख्य अभियंता श्री. सुनील काकडे, अधीक्षक अभियंता श्री. ज्ञानदेव पडळकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भुपेंद्र वाघमारे व श्री. श्रीकृष्ण वायदंडे आणि सहकाऱ्यांनी स्वीकारला. तर उपविजेत्या नागपूर-चंद्रपूर-गोंदिया संघाकडून मुख्य अभियंता श्री. सुहास रंगारी, श्री. दिलीप दोडके, श्री. हरीष गजबे व सहकाऱ्यांनी करंडक स्विकारला. पारितोषिक वितरणच्या कार्यक्रमाला स्पर्धेचे मुख्य समन्वयक व मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके, आयोजन समितीचे अध्यक्ष व मुख्य अभियंता श्री. अशोक साळुंके, मुख्य अभियंता श्री. राजेश नाईक, महाव्यवस्थापक श्री. राजेंद्र पांडे यांची उपस्थिती होती. पाहुण्यांच्या हस्ते या स्पर्धेतील सांघिक व वैयक्तिक विजेते व उपविजेत्यांना करंडक व सुवर्ण/रौप्य पदक प्रदान करून गौरविण्यात आले. सांघिक खेळांचे अंतिम निकाल - अनुक्रमे विजेता व उपविजेता : क्रिकेट कोल्हापूर व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया, व्हॉलिबॉल- लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया, टेबल टेनिस - पुरुष- लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड व सांघिक कार्यालय-भांडूप, बॅडमिंटन - पुरुष- पुणे-बारामती व लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड, कॅरम पुरुष- लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया, ब्रिज- अमरावती-अकोला व लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड,

वैयक्तिक खेळांचे अंतिम निकाल (कंसात संघ)- गोळा फेक सुवर्ण पदक - पुरुष गट श्रीकांत धोत्रे (लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड) भाला फेक सुवर्ण पदक -पुरुष गट बालाजी कांबळे (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर) बुध्दीबळ - पुरुष गट सुवर्ण पदक पंकज देशमुख (लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड), कुस्ती- ५७ किलो सुवर्ण पदक मतीन शेख (लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड) ६५ किलो रौप्य पदक - विजय जगताप (लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड), ७४ किलो-रजत पदक- अमोल मुंगळे (लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड), ९२ किलो रौप्य पदक- बलराज अलाणे (लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड), १२५ किलो रौप्य पदक वैभव पवार (लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड) पॉवर लिफ्टिंग ५९ किलो रौप्य पदक- रवी निर्गणे (लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड), बॅडमिंटन - पुरुष दुहेरी रौप्य पदक- दीपक नायकवडे-गुणवंत इप्पर (लातूर-छत्रपती संभाजीनगर-नांदेड)

# श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी** : येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.१५ नोव्हेंबर २०२५ शनिवार रोजी स्वातंत्र्य सेनानी, आदिवासी समाजाचे जननायक भगवान बिरसा मुंडा यांची जयंती तसेच भगवान बिरसा मुंडा जनजाती गौरव पंधरवडा अत्यंत उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता व बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी मंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे,पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, पर्यवेक्षक धनंजय कुलकर्णी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, परिपाठ प्रमुख लता कुलकर्णी, ज्ञानोपासक मंडळ प्रमुख श्रीमती तेजस्विनी सांजेकर, कार्यक्रम प्रमुख श्रीमती प्रज्ञा नाईक यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमात विद्यार्थिनींनी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या तेजस्वी जीवनचरित्रावर आधारित विविध कलाकृती आणि माहिती सादर करून त्यांच्या योगदानाला आदरांजली वाहिली. इयत्ता आठवी अ वर्गातील विद्यार्थिनी कु. माहेश्वरी मेघराज पाटील हिने भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवन चरित्रावर आधारित विषय मांडणी केली.

# विश्वेश्वरय्या पब्लीक स्कुलमध्ये आर्ट ऑफ लिव्हींगद्वारा युवक सक्षमीकरण शिबीर



**औसा/प्रतिनिधी** : तालुक्यातील आलमला येथील विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुल लातूर येथे आर्ट ऑफ लिव्हग लातूर व शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला यांच्या संयुक्त विद्यमाने युवक सक्षमीकरण तीन दिवसीय शिबीराचे आयोजन करण्यात आले. या युवक सक्षमिकरण शिबीराचे उद्घाटन आर्ट ऑफ लिव्हींगचे अंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षक अमोल वागले यांच्या शुभ्हस्ते व संस्थचे सचिव बसवराज धाराशिवे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी योग प्रशिक्षिका लीना पंडित, दिपाली मसुतगे, अदिती सोनी,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, प्रमुख पाहुण्या अंजोरी परांडेकर, प्रा. दिनेश गुजराथी, डॉ. समीर शफी, प्राचार्य किशोर जेवे, प्रा. एस.एस. वागदरे, ऋतिक धाराशिवे, कार्यक्रम समन्वयक प्रगती कांबळे इत्यादी उपस्थितीत होते.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात योगा, प्राणायम, ध्यान धारना, आरोग्यासाठी किती उपयुक्त आहे याबाबतीत मार्गदर्शन केले. आज विद्याथ्र्यांना स्पर्धेच्या युगात सकारात्मक दृष्टीकोन निमार्ण व्हावा यासाठी अशा शिबीराचे आयोजन संस्थेच्या माध्यमातून करत असल्याचे सांगितले.

आर्ट ऑफ लिव्हींगचे अंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षक अमोल वागले यांनी युवक सक्षमीकरणाकरीता ध्यान धारना ची गरज असून याद्वारे त्यांची भावनिक बुध्दीमत्ता विकसीत होते. तसेच विद्याथ्र्यामध्ये आत्मजागरुकता निर्माण होऊन व तणावाचे व्यवस्थापन करुन ध्येय साध्य करण्यास मदत होऊन येणाया आव्हानाचा सामना करण्यास एक प्रकारची सकारात्मकता, प्रभावी संवाद कौशल्य विकसीत होते. याकरीता आर्ट ऑफ लिव्हींगचया माध्यमातून जगभरात युवक सक्षमिकरण शिबीर राबविले जातात.

योग प्रशिक्षीका लीना पंडीत, दिपाली मसुतगे, अदिती सोनी यांनी योगा-प्राणायम द्वारे युवकामध्ये सामाजीक कौशल्य, करीअर आणि जीवन कोशल्य विकसीत होण्यास मदत होत असल्याचे सांगून आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये योगाचे असलेले महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

या तीन दिवसीय शिबीराच्या यशस्वीतेसाठी प्रा. विद्या येलम, डॉ. वनीता वाडेवाले, डॉ. रामेश्वर धानुरे, पायल जाधव, वैष्णवी हावळे, विरभ्रद स्वामी, महेश होनराव, प्राकश वल्लेकर यांनी अथक परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रा. एस.एस. वागदरे यांनी केले.

# औसा नगरपालिकेसाठी भाजप पक्षाकडून डॉ. सौ. ज्योती बनसुडे यांचा नगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल





**औसा/प्रतिनिधी** : भारतीय जनता पक्षाने औसा नगरपरिषद निवडणुकीत शक्ती प्रदर्शनाचा झंझावात उभा करत सोमवारी नगराध्यक्ष पदासाठी डॉ. सौ. ज्योती महादेव बनसुडे यांचा उमेदवारी अर्ज भव्य उत्साहात दाखल केला. नामांकनाचा शेवटचा दिवस असल्याने शहरातील राजकीय वातावरण अधिकच तापले होते. भाजप कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची अभूतपूर्व गर्दी पाहता औसा शहरात भाजप' ची ताकद पुन्हा एकदा ठळकपणे जाणवली.

डॉ. बनसुडे यांच्या उमेदवारी अर्जावेळी आमदार अभिमन्यू पवार, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी माने,औसा मंडळध्यक्ष शिव मुरगे,माजी उपमहापौर देवीदास काळे, संतोष मुक्ता, बंडू कोद्रे, किरणं उटगे, अँड मुक्तेश्वर वागधरे, अँड अरविंद कुलकर्णी, गिरीश पाटील, किरण उटगे, सुनील मिटकरी, कल्पना डांगे, सौ. शोभाताई अभिमन्यू पवार, प्रा सुधीर पोतदार, अँड. परिक्षीत पवार, हाणमंत राचट्टे,शाम भोसले, लहू कांबळे, विनोद जाधव, दत्ता पुंड,शंकर पुंड,वसीम मुनीर आली सय्यद,अक्रम पठाण सह विविध पक्षांचे आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे वातावरणात उत्साह आणि जोश ओसंडून वाहत होता. अर्ज दाखल करण्यापूर्वी हनुमान मंदिर परिसरातून निघालेल्या भव्य शक्ती प्रदर्शनाने शहराचे लक्ष वेधून घेतले. ढोल-ताशांच्या जोरदार निनादात, कमळाच्या झेंड्यांनी सजलेल्या रॅलीत शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले. महिला, युवक आणि ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी दिलेल्या उपस्थितीमुळे रॅली अधिक दमदार आणि आकर्षक बनली.


# विभागीय रेल्वे व्यवस्थापक,सोलापूर कार्यालयाला नगर राजभाषा कार्यान्वयीन समिती, सोलापूर कडून राजभाषा शिल्ड प्रदान

**सोलापूर/प्रतिनिधी** : दिनांक १४.११.२०२५ रोजी, नगर राजभाषा कार्यान्वयन समिती, सोलापूर यांचे द्वारा आयोजित पुरस्कार वितरण समारंभात, विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, सोलापूर यांना २०२४-२५ या वर्षात राजभाषा हिंदीच्या सर्वोत्तम कामगिरी करिता केंद्र सरकारच्या कार्यालये/उपक्रमांच्या श्रेणीमध्ये राजभाषा कार्यान्वयन समिति, सोलापुर ची दुसरे क्रमांकाचे पारितोषिक म्हणून ‘‘राजभाषा शील्ड‘‘ आणि प्रमाणपत्र भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या राजभाषा विभागाचे हिंदी शिक्षण योजनेचे उपसंचालक श्री राजेंद्र प्रसाद वर्मा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.




श्री अंशुमाली कुमार, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक आणि अतिरिक्त मुख्य राजभाषा अधिकारी, श्री एस.एल. खोत, सहाय्यक कार्मिक अधिकारी आणि संपर्क राजभाषा अधिकारी आणि राजभाषा विभागाचे कर्मचारी, राजभाषा शिल्ड स्वीकारत आहेत.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# बियर बार, देशी दारूचे दुकाने फोडणारे व वाहने चोरणाऱ्या दोन जणांना ४६ लाख ४५ हजार रुपयांच्या मुद्देमालासह अटक

## १५ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** बियर बार, देशी दारूचे दुकाने फोडणारे व वाहने चोरणाऱ्या दोन आरोपींना ४६ लाख ४५ हजार रुपयांच्या मुद्देमालासह अटक करण्यात आली असून या दरम्यान १५ गुन्हे उघड झाल्याने खळबळ उडाली असून सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, गेल्या काही महिन्यांपासून लातूर जिल्ह्यातील विविध भागांमध्ये चार चाकी दुचाकी वाहने चोरीच्या तसेच बियर बार व देशी दारू दुकान फोडून दारू चोरीच्या घटना घडत होत्या. या संदर्भातील अनेक गुन्हे लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल झाले होते. नमूद गुन्ह्यांचा तपास प्राधान्याने व जलदगतीने करून इसमांचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सर्व गुन्ह्यांचा सखोल आढावा घेऊन विशेष सूचना व मार्गदर्शन केले होते.

या सूचनांच्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथक तयार करण्यात आले होते. हे पथक गोपनीय आणि तांत्रिक माहितीच्या आधारे अज्ञात इसमांचा शोध घेत होते.




दरम्यान दिनांक १७/११/२०२५ रोजी पथकाला गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, मौजे बोरोळ येथील एका शेतामध्ये दोन ट्रॅक्टर व मोटार सायकल सह दोन इसम संशयीतरित्या थांबलेले आहेत. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर पथकाने माहितीच्या ठिकाणी सापळा लावुन मौजे बोरोळ येथील एका शेतामध्ये दोन ट्रॅक्टर, दोन मोटार सायकल सह दोन संशयित इसम प्रदीप विष्णु यशवंते वय २६ वर्षे रा. देवळा ता. अंबाजोगाई जि. बीड, शाम ओमकार जमादार वय २५ वर्षे रा. मोरंबी ता. भालकी जि. बिदर राज्य कर्नाटक यांना ताब्यात घेवुन त्यांची व त्याच्याकडील दोन ट्रॅक्टर व दोन मोटार सायकलसह ताब्यात घेवून पंचसमक्ष अंगझडती घेतली असता त्यांच्या अंगझडतीमध्ये रोख ५,२०,०००/- रुपये मिळून आले. त्यांच्याकडे मिळून आलेल्या रक्कम व ट्रॅक्टर, मोटर सायकल बाबत गुन्हयाच्या अनुषंगाने विश्वासात घेवुन विचारपुस केली तेव्हा त्यांनी त्यांच्या आणखीन एक साथीदार ३) प्रदीप उर्फ लालु माधव कांबळे, वय २४ वर्षे रा. बसपुर ता. निलंगा जि. लातूर असे तिघांनी मिळून लातूर जिल्हयातील विविध ठिकाणाहून ०५ ट्रॅक्टर,०१पिकअप, २ स्कारपिओ चोरी केली असून ०४ बिअर बार बिअर शॉपी व देशी दारू दुकानफोडुन दारूची चोरी केली असून एका शेतातील सोयाबीन चोरी केली आहे तसेच दोन मोटारसायकली चोरी केल्याचे कबूल केले आहे.

तसेच त्यांच्याकडे चोरी केलेली स्कारपिओ गाडी व बियरबार, देशी दारू दुकान फोडुन चोरी केलेली दारु व सोयाबीन विक्री करुन आलेली ५,२०,०००/-रुपये रोख रक्कम असल्याचे सांगितल्याने नमुद रोख रक्कम व दोन ट्रॅक्टर व दोन मोटार सायकल दोन्ही ताब्यात घेण्यात आली आहे.

इसमांनी सांगितलेल्या ठिकाणवरुन लातूर जिल्हा पोलीस स्टेशनच्या अभिलेखाची पाहणी केली असता नमुद ट्रॅक्टर व मोसा, बार फोडुन व सोयाबीन चोरीबाबत (१) पोस्टे लातूर ग्रामीण गुरनं २४०/२०२४ कलम ३०३ ( भा.न्या.सं., २) पोस्टे रेणापुर गुरनं १९१/२०२२ कलम ३७९ भादवी ३) पोस्टे रेणापुर गुरनं १८८/२०२५ कलम ३०३ (२) न्या.सं. ४) पोस्टे गातेगाव गुरनं ८०/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. ५). पोस्टे किल्लारी गुरनं ०६/२०२५ कलम ३०३ भा.न्या.सं. ६). पोस्टे किल्लारी गुरनं १३५/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं., ७). पोस्टे उदगीर ग्रामीण गुरनं ३२३/२० कलम ३०३ (२) भा.न्या.सं., ८). पोस्टे मुरुड गुरनं २५७/२०२५ कलम ३०३ (२) मा.न्या.सं., ९). पोस्टे एमआयडीसी गु ४३५/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं., १०). पोस्टे एमआयडीसी गुरनं ५२५/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं., ११). पो किल्लारी गुरनं ३२१/२०२३ कलम ४५७,३८० भादवी, १२). पोस्टे मुरुड गुरनं २८२/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. १३)पोस्टे भादा गुरनं १५४/२०२५ कलम ३३१ (२) ३०५ भा.न्या.सं., १४). पोस्टे आनंदनगर जि. धाराशिव गुरनं ३६१/२०२५ क ३०३ (२) भा.न्या.सं. १५)पोस्टे देवणी गुरनं ३३१/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं., प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर रोख रक्कम व ट्रॅक्टर, मोटर सायकल इसमाकडुन पंचासमक्ष ताब्यात घेतले आहे.

एकंदरीत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनात बिअर बार देशी दारू दुकान फोडून दारूची चोरी करणारे तसेच लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चारचाकी व दुचाकी वाहने चोरणाऱ्या दोन आरोपींना गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे ताब्यात घेऊन लातूर जिल्ह्यातील १५ माला विषयक गुन्हे उघडकीस आणून एकूण ४६ लाख ४५ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे निर्देशान्वये, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर याच्या नेतृत्वातील पथका मधील सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे,प्रमोद देशमुख,पोलीस सपोउपनि सर्जे राव जगताप, पोलीस अंमलदार युवराज गिरी,संजय कांबळे, मोहन सुरवसे, राजेश कंचे, सूर्यकांत कलमे, रियाज सौदागर, साहेबराव हाके,तुराब पठाण सिद्धेश्वर मदने, जमीर शेख, राहुल कांबळे, तुळशीराम बरुरे, पाराजी पुठेवाड, मनोज खोसे, गोविंद भोसले, गणेश साठे, शैलेश सुडे, प्रदीप चोपणे, श्रीरंग जांभळे, महिला पोलीस अमलदार अंजली गायकवाड यांनी केली आहे.


## CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM PATEL FAKIRABEGAM HAJARAT TO NOORJAHAN kHAYYUM SAYYAD HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE. NOORJAHAN kHAYYUM SAYYAD IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY.

OLD NAME: PATEL FAKIRABEGAM HAJARAT

NEW NAME: NOORJAHAN kHAYYUM SAYYAD

ADDRESS: Navrang Building Datta Nagar NILANGA Dist LATUR ,MAHARASHTRA-413521


## लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणमार्फत बाल दिनानिमित्त
# यशवंत विद्यालय येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या समान कार्यक्रमानुसार लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर जिल्हा न्यायालय व कलापंढरी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली यशवंत विद्यालय येथे शुक्रवारी बाल दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी बाल दिन का साजरा केला जातो, कायद्यानुसार बालकाची व्याख्या काय, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणच्या २०२४ मधील योजनेनुसार मुलांसाठी अनुकूल विधी सेवा योजनेबाबत, तसेच बालकांचे कायदेशीर हक्क व अधिकार याबाबत मुलांना मार्गदर्शन केले.

यावेळी यशवंत विद्यालयातील मुख्याध्यापिका डॉ. सुवर्णा जाधव, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. माधवराव गादेकर, कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी.पी. सूर्यवंशी, वकील सुनैना बायस व विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. बाल दिनानिमित्त यशवंत विद्यालयात चित्रकला, रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

बालकांच्या संरक्षण, अधिकार व हक्कासाठी असलेले किशोर न्याय (काळजी व संरक्षण) कायदा २०१५, लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२, बालविवाह प्रतिबंध कायदा २००६, बाल मजुरी प्रतिबंध कायदा १९८६ व बाल हक्क संरक्षण आयोग कायदा २००५ या कायद्यांबाबत श्री. गिरवलकर यांनी यावेळी माहिती दिली.

## 'ऊत' भावनांचा उद्रेक: आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेता मराठी चित्रपट २१ नोव्हेंबरला प्रदर्शित

### लातूरचे सुपुत्र पुरुषोत्तम वाघ यांची चित्रपटात भूमिका




**लातूर/प्रतिनिधी :** 'ऊत' भावनांचा उद्रेक हा मराठी चित्रपट येत्या २१ नोव्हेंबरला प्रदर्शित होत आहे. चित्रपटात लातूर जिल्ह्यातील मुरुड नायगावचे सुपूत्र पुरूषोत्तम वाघ यांची महत्त्वाची भूमिका आहे. लातूरच्या या कलावंताचा दमदार अभिनय पाहण्यासाठी प्रेक्षकांनी चित्रपटगृहात नक्की यावे, असे आवाहन निर्मात्यांनी केले आहे.

वाघ यांचा अभिनय क्षेत्रातील अनुभव मोठा आहे; त्यांनी यापूर्वी अनेक मराठी व हिंदी मालिका, लघुपट, जाहिराती तसेच एका मल्याळम् चित्रपटातही काम केले आहे. नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम.ए. (नाट्यशास्त्र) पूर्ण केलेले आहे.

प्रदर्शनापूर्वीच चित्रपटाला आंतरराष्ट्रीय १८ पुरस्कार प्राप्त आहेत. लातूरचे सुपुत्र आणि गुणी कलाकार वाघ यांनी या चित्रपटात 'नंदू' ची भूमिका साकारली आहे. त्यांची ही भूमिका संघर्ष, रोमान्स आणि एका उत्कृष्ट नेत्यामध्ये असणारे गुण दाखवणारी आहे.

### निरीक्षण ..

हरलो जिंकलो तरी
कराया हवे परिक्षण
डाव्या उजव्या बाबी
सूक्ष्मते करेनिरीक्षण

गडबडकाही असता
पाऊले उचले तक्षण
वेळीचं उचित तक्रार
व्हावेसंविधान रक्षण

विजयी नेते मंडळीचे
सर्वत्र चालते औक्षण
मेहनतीकार्यकर्त्यांचे
कौतुक हो क्षणोक्षण

निकाल अनपेक्षितते
का लागले विलक्षण
तत्पर जायचेमुळाशी
हो सखोल पर्यवेक्षण

निवड प्रक्रिये विषयी
नको खोटे अनवेक्षण
अनेकपर्याय उपलब्ध
स्थिती जरी अ लक्षण

दाद प्रमादा विरोधात
ठोस द्यायचे उत्प्रेक्षण
बागुलबुवासंशयग्रस्त
कशाला करंटे लक्षण

समजूघेई कार्यकर्त्यां
कायकरतो समीक्षण
पुढील वाटचालीस्तव
मार्ग मिळेल सुलक्षण

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# प्रभुराज प्रतिष्ठाणच्या वतीने वंचित व गरजू लोकांना माणुसकीची चादर...मायेची ऊब



**लातूर/प्रतिनिधी :** प्रभुराज प्रतिष्ठाण,लातूर वतीने मायेची ऊब सतत ११ वर्षे अविरत सेवा हिवाळ्यात गरजू व वंचित लोकांना उभदार चादर वाटप करण्याचे उपक्रम हाती घेतला जेणे सध्या कडाक्याची थंडी वाडत असल्याने प्रत्येकजण थंडीपासून बचाव करण्यासाठी उबदार कपडे परिधान करतात त्याच परिस्थिती लातूर शहरात बेघर आणि निराधार लोक कश्याचा तरी आसरा घेत निपुटपणे थंडीत कुडकुडत झोपत असत पण त्यांचे ही थंडीपासून बचाव व थंडीचा सामना करण्यासाठी प्रभुराज प्रतिष्ठाणने पुढाकार घेत झोपित असलेल्या वंचित लोकांना उबदार मायेची चादर पांगरण्यात आली तसेच त्यांच्या अंगावर मायेची उबदार चादर पांगरण्यासाठी वंचित,गरजू लोकांचा रात्रभर शोध घेत कोणी दुकानाच्या तर कोणी बसस्थानकचा आडोसा पकडत आपली रात्र घालत असताना दिसून येताच सामाजिक बांधलकी जपून यांना मदत करण्याचा प्रयत्न केला आणि जसे जमेल तसे सहकाऱ्याच्या साहाय्याने उबदार चादरी वाटप करून कर्तव्य निभावण्याचा प्रयत्न केला कोणी वेढ्याच्या परिस्थिती आढळून आले असता त्यांचे गैरवर्तणुक व छिडछिडेपणा ही सहन करत त्यांना आपल्यात सांभाळून घेत तेही मानव आहेत अशी भावना ठेवत त्यांनाही मदत केली.

यावेळी प्रभुराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष अँड.अजय कलशेट्टी,सचिन गोलावर,डॉ. संजय जमदाडे, विलास भुमकर,विनोद गायकवाड,हुसेन पठाण, अभिजित सिरसाठ, शशीकिरण नागुरे,नंदकिशोर बणाळे,महेश खेकडे,विजय वारद,अशोक पंचाक्षरी,शाम सावंत,गोपाळ कतलाकुट्टे,नेवासस्कर, सचिन वांगस्कर, रवी घुगरे,राम डूमने,आदीनि परिश्रम घेतले.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**स्थानकांवर केटरिंग स्टॉल्स (चहा स्टॉल्स) चा करार**

सोलापूर विभागातील A1, A.B आणि D.E.F श्रेणीतील स्थानकांवर वार्षिक आणि पाच वर्षांच्या कालावधीसाठी केटरिंग स्टॉल्स (चहा स्टॉल्स) च्या संचालनासाठी करार वाटपासाठी ई-लिलाव. **लिलाव कॅटलॉग क्रमांक: SUR-C-TG-25-25.** **लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळ:** प्रारंभ - वेळ १२.०० दि. २८.११.२०२५ बंद - वेळ १३.४० दि. २८.११.२०२५. **स्थानकांचे नाव:** १. मोहोल २. दुधनी ३. माधा ४ आराग ५. मॉडलिंब ६. लातूर ७. भिगवान ८. कुर्डुवाडी येथील चहाच्या स्टॉलचा ई-लिलाव. **पद्धत:** आयरेप्स-ई लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल). **निविदा कालावधी:** वार्षिक परवाना शुल्क आणि चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी १०% वाढीसह ५ वर्षे. **वेबसाइट पत्ता:** सर्व ई-लिलाव तपशील संबंधित माहिती आणि कागदपत्रे मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टल **www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहेत. अर्ज करण्यापूर्वी सहभागींनी वेबसाइटला भेट द्यावी अशी विनंती आहे.

Akar/Sur-70 एसीएम/गुड्स/सोलापूर

रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

**निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/29.** सीनियर डिव्हिजनल इलेक्ट्रिकल इंजिनिअर (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक इलेक्ट्रिकल कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत. **कामाचे नाव:** सोलापूर विभागातील वायर नसलेल्या पिट लाईन्स/साइडिंगचे विद्युतीकरण. **अंदाजे खर्च:** १,५३,८३,७०१.७९/- **बोली सुरक्षा:** २,२६,९००/-. **काम पूर्णता कालावधी:** १२ महिने. **ऑफरची वैधता:** ६० दिवस. **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** १२.१२.२०२५ रोजी १५:०० वाजता. सीनियर डिव्हिजनल इलेक्ट्रिकल इंजिनिअर (TRD) सीआर, सोलापूर

Akar/Sur-67A

रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

**निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/19R1.** वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. **कामाचे नाव:** सोलापूर विभागातील दौंड-वाडी विभागातील मंडियाळ (GSS) ते गौडगाव (TSS) पर्यंतच्या ११० केव्ही ट्रान्समिशन लाइन, सिंगल सर्किट, टू फेज, ५० हर्ट्झच्या खराब झालेल्या घटकाची स्थिती देखरेख, दुरुस्ती आणि बदली. (पुनर्निमंत्रण). **अंदाजे किंमत:** १०,३१,३४५.१९/- **बोली सुरक्षा:** २०,६००/-. **काम पूर्णता कालावधी:** २४ महिने. **ऑफरची वैधता:** ६० दिवस. **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** १०.१२.२०२५ रोजी १५:०० वाजता. वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) सीआर, सोलापूर

Akar/Sur-69

रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

**निविदा क्रमांक. SUR/L/T/2024/48R2.** वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, सामान्य, मध्य रेल्वे, सोलापूर, आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत. **कामाचे नाव:** सोलापूर विभागातील ५ गुड्स शेड येथे ट्रॅकच्या बाजूला ६ गुड्स शेडवर हाय मास्ट लाइटिंगची तरतूद करण्याच्या संबंधात कामाचा इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिस भाग. (पुनर्निमंत्रण). **अंदाजे खर्च:** ७२,२४,८२९.७६/- **बोली सूरक्षा:** १,४४,५००/- **पूर्णता कालावधी:** ०६ महिने. **ऑफरची वैधता:** ६० दिवस. **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** ११.१२.२०२५ रोजी १५:०० वाजता. बोली सुरक्षा खर्च **www.ireps.gov.in** वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरावा लागेल. वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (जी) सीआर, सोलापूर

Akar/Sur-68

रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र**
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

**टोनर रिफिलिंग**
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
**प्रिंटर्स पॅराडाईस**
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादक: दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६